उपक्रम

## दि. १२ मे रोजी राज्यस्तरीय परिसंवाद

# 'बसवंत कृषी पर्यटन महोत्सवा'चे दि. ११ ते १५ मे दरम्यान आयोजन

## आंबा महोत्सव आणि चित्रकला स्पर्धेचाही समावेश

अलिकडे आधुनिक जगाला सामोरे जात असताना, यांत्रिक आणि शहरीकरणाकडे वेगाने वाटचाल करणारी जीवनशैली आपल्याला अपरिहार्यपणे स्वीकारावी लागते आहे. मात्र अशा कृत्रिम वातावरणात दिनचर्या सुरू असताना विरंगुळा शोधणेही गरजेचे ठरते.

हे लक्षात घेता, कृषी संस्कृती आणि त्या अनुषंगाने कृषी पर्यटन यांच्याशी निगडित असा एखादा आनंदोत्सव साजरा करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर 'पूर्वा केमटेक प्रा.लि.' संचालित आणि 'ग्रीनझोन अ‍ॅग्रोकेम प्रा.लि.' च्या सहयोगाने आयोजिलेला 'बसवंत कृषी पर्यटन महोत्सव' ही शहरी तसेच ग्रामीण नागरिकांसाठीही एक सुवर्णसंधी आहे. बसवंत गार्डन, मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत, जि. नाशिक येथे दि. ११ ते १५ मे २०२२ दरम्यान हा उपक्रम साजरा होणार आहे, अशी माहिती 'पूर्वा केमटेक' आणि 'ग्रीनझोन अ‍ॅग्रोकेम'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी दिली.

या अनुषंगाने 'बसवंत कृषी पर्यटन' महोत्सवांतर्गत राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन पर्यटन क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत गुरुवार, दि. १२ मे २०२२ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ दरम्यान होईल. कृषी पर्यटनाचा विविध बाजूंनी परामर्श घेणाऱ्या विषयांचा यात अंतर्भाव करण्यात आला आहे.

कृषी पर्यटनाची संकल्पना, महाराष्ट्र राज्यात या विषयी उपलब्ध असलेल्या संधी, पर्यटन उद्योगात राज्यात नावलौकिक प्राप्त केलेल्या व्यावसायिकांचा मार्गदर्शक सहभाग, या संदर्भातील विविध शासकीय योजना तसेच कृषी पर्यटन महोत्सवातील सहयोग असे कार्यक्रमाचे भरगच्च नियोजन आहे. उपस्थितांना बसवंत संकुलातील मधमाशी उद्यान, बसवंत प्रक्रिया उद्योग केंद्र त्याचप्रमाणे आदर्श गाव 'सेवरगांव'ला भेट देता येईल.

या परिसंवादातील सहभाग नि:शुल्क असून, पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. प्रवेश संख्या मर्यादित स्वरुपात निर्धारित केलेली आहे. अधिक तपशिलासाठी श्री. विक्रांत पाटील (मो.क्र. ८६६९९३२९८२) यांच्याशी संपर्क साधता येईल.

शेतकरी बांधवांनी पिकविलेल्या दर्जेदार हापूस आणि केशर जातींच्या आंब्यांचे नमुने येथील 'आंबा महोत्सवा'त स्पर्धात्मक दृष्टीने आकर्षकपणे मांडले जाणार आहेत. तज्ज्ञांद्वारे त्यांचे परीक्षण केले जाणार आहे. सर्वोत्कृष्ट ठरलेल्या दोन्ही जातींना 'मिलांज आंबा महाराजा' (हापूस) तसेच 'मिलांज आंबा महाराजा' (केशर) असे विशेष पुरस्कार दिले जातील.

त्याचप्रमाणे हापूस आणि केशर या दोन्ही जातींसाठी प्रत्येकी प्रथम (रु. ३००१), द्वितीय (रु. २००१) व तृतीय (रु. १००१) असे पुरस्कार दिले जातील. प्रोत्साहनपर पाच बक्षिसेही स्वतंत्रपणे दिली जाणार आहेत. कृषी-उद्योजकता वाढीस लागावी; व्यापार उदीम व त्याबरोबरच पर्यटकांचे मनोरंजनही शक्य व्हावे, अशा आशयाच्या 'बसवंत गार्डन'च्या ब्रीदवाक्याला अनुसरून हे नियोजन करण्यात आले आहे. या आंबा महोत्सवाचा एक भाग म्हणून शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी आणि खुल्या स्तरावर चित्रकला स्पर्धा होणार आहे. यातील निवडक चित्रे प्रदर्शनात मांडली जातील. स्पर्धेचे विषय- १) कृषी पर्यटन मॉडेल आणि २) आंबा याप्रमाणे आहेत. गट क्रमांक १ : इयत्ता ५ वी ते ७ वी, गट क्रमांक २ : इयत्ता ८ वी ते १० वी तसेच गट क्र. ३ : खुला (सर्वांकरिता) अशी स्पर्धकांची विभागणी असून, तीनही गटांमधील विजेत्यांना स्वतंत्रपणे प्रथम (रु. २०००), द्वितीय रु. १५००) आणि तृतीय (रु. १०००) अशी पारितोषिके दिली जातील. तसेच उत्तेजनार्थ तीन बक्षिसे (रु. ५००) दिली जाणार आहेत.

प्रत्येक स्पर्धकाला 'बसवंत गार्डन'चा प्रवेश पास, बसवंत फ्रूट जॅमचे गिफ्ट आणि सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल. संबंधितांनी आपले चित्र दि. ११ ते १३ मे २०२२ दरम्यान 'बसवंत गार्डन', मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक येथे स्वत: जमा करावयाचे आहे. चित्रस्पर्धेच्या संदर्भातील अन्य तपशिलासाठी श्री. शरद शेवाळे (मो.क्र. ९९२२४१०८७२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. ■